महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

==========================================================================

अत्यत महत्वाचे /कालमर्यादित

जा.क्र.तंशिविकापू/विवि/२०२०/ 2424
दिनांक : २०/०८/२०२०
20 AUG 2020

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या,
सर्व पदवी व पदव्युत्तर संस्था
(पुणे विभाग)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०२०/१८८ दि ३०/०४७/२०२०
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०२०/१८९ दि ३०/०४७/२०२०

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रे या कार्यालयास प्राप्त झाली असून .सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत असून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत मा. संचालक, तं.शि.सं.मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यानूसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनी आपल्या संस्थांची प्रवेशक्षमते बाबतची कागदपत्रे http://www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर संस्थेच्या लॉगीनमधुन अपलोड करावी.

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेकरीता प्रवेशक्षमता निश्चित करण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबधीची असल्याने माहितीची संवेदनशीलता व तातडी लक्षात घेवून संस्थेच्या लॉगीनमधुन ऑनलाईन पध्दतीने अचूक माहिती भरणेबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्‌भवल्यास, त्यास सर्वस्वी संबधित संस्था जबाबदार राहील याची नोंद घ्यावी .

या विभागीय कार्यालयाच्या लॉगीन मध्ये संस्थांकडून प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करण्यात येत असून ज्या संस्थांनी अपूर्ण कागदपत्रे अथवा चुकीची प्रवेशक्षमता अपलोड केली आहे. अशा संस्थांची माहिती दुरुस्ती करीता / आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याकरीता संस्थांच्या लॉगीन मध्ये परत पाठविण्यात येत आहे. (unconfirm) अशा सर्व संस्थांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन माहिती तात्काळ पुनःश्च सादर करावी माहिती मध्ये कोणत्याही प्रकारची चूक असणार नाही याबाबत दक्षता घ्यावी ज्या संस्थांनी नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /अभ्यासक्रमाच्या नांवात बदल करणेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या कडून मान्यता प्राप्त केली आहे. तसेच विद्यापीठ संलग्नता व शासन निर्णय प्राप्त झाला आहे. अशा सर्व संस्थांनी नवीन अभ्यासक्रमांचा/नांवात बदल झालेल्या अभ्यासक्रमांचा समावेश प्रवेश प्रक्रियेत करण्यासाठी या कार्यालयात सर्व कागदपत्रे सादर करावीत तसेच या कार्यालयाशी प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे श्री एस.बी.शिंदे (प्रोग्रामर) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी सदर नवीन /नावात बदल झालेल्या अभ्यासक्रमांचा समावेश प्रवेश प्रकियेमध्ये न झाल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची नोंद घ्यावी

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे